**मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यरत न्यायमुर्ती व त्यांच्या कुटुंबियांच्या २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारा व्यतिरिक्त इतर कोणत्याही आजारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीबाबत...**

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रमांकः वैखप्र-२०१७/प्र.क्र.१०/२०१७/राकावि-२,**
**गोकूळदास तेजपाल रुग्णालय,संकूल इमारत,**
**१० वा मजला,मंत्रालय,मुंबई.**
तारीख: **१५ नोव्हेंबर, २०१७.**

**वाचा -**

1) **शासन निर्णय क्रमांकः** सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय,क्रमांक-वैखप्र-२०१७/प्र.क्र.१०/१७/ राकावि-२,दिनांक-२७ जानेवारी,२०१७.

**प्रस्तावना -**

मा.उच्च न्यायालयाचे कार्यरत न्यायमुर्ती यांना व त्यांच्या कुटुंबियांना २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारा व्यतिरिक्त इतर कोणत्याही आजारासाठी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे आणि खाजगी रुग्णालये/दवाखाने तसेच वैद्यकीय प्रयोगशाळामध्ये करण्यात येणा-या विविध वैद्यकीय चाचण्यांवर होणा-या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय,क्रमांक-वैखप्र-२०१७/प्र.क्र.१०/१७/ राकावि-२,दिनांक-२७ जानेवारी,२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामधील काही विदयमान तरतूदींमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय शुध्दीपत्रक-

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय,क्रमांक-वैखप्र-२०१७/प्र.क्र.१०/१७/ राकावि-२,दिनांक-२७ जानेवारी,२०१७ मध्ये खालील कोष्टकांत नमूद केल्यानुसार सुधारणा करण्यास या शासन निर्णय शुध्दीपत्रकाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शासन निर्णय दिनांक-२७/०१/२०१७ मधील विदयमान तरतूद | दुरुस्ती |
|---|---|---|
| १. | परिच्छेद १ (इ) Group Medical Insurance Premium करिता प्रति न्यायाधीश व त्यांच्या कुटुंबियांसह रुपये-५,००,०००/- इतक्या रकमेच्या पॉलिसी करिता प्रतिवर्ष येणारा विमा हप्ता. | परिच्छेद १ (इ) Medical Insurance Premium करिता प्रति न्यायाधीश व त्यांच्या कुटुंबियांसह रुपये-१०,००,०००/- इतक्या रकमेच्या पॉलिसी करिता प्रतिवर्ष येणारा विमा हप्ता. |

| | | |
|---|---|---|
| २. | परिच्छेद २ मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यरत न्यायमूर्ती व त्यांचे कुटुंबियांना उक्त नमूद अ ते ड बाबींवरील होणा-या वैद्यकीय खर्चाच्या रुपये-१,००,०००/- प्रति वर्ष रकमेच्या मर्यादेतील खर्चास मंजुरी देण्याचे प्राधिकार मा.मुख्य न्यायमुर्ती,उच्च न्यायालय,मुंबई यांना प्रदान करण्यात येत आहेत. रुपये-१,००,०००/- प्रति वर्ष या मर्यादेपेक्षा जास्त खर्चाचे प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव समितीसमोर सादर करण्यात यावेत. | परिच्छेद २ मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यरत न्यायमूर्ती व त्यांचे कुटुंबियांना उक्त नमूद अ ते ड बाबींवरील होणा-या वैद्यकीय खर्चास मंजुरी देण्याचे पूर्ण अधिकार मा.मुख्य न्यायमुर्ती,उच्च न्यायालय,मुंबई यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

**२. हा शासन निर्णय या निर्णयाच्या दिनांकाला प्रलंबित प्रकरणांना देखील लागू राहील.**

३. हे शुध्दीपत्रकाचे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक- व्यय-५,दिनांक-०२/११/२०१७ नुसार निर्गमित करण्यांत येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११५११३००७१११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7256abb8dd472637941e581488fb02eda9e0d6b701c434bcf471a0d525f80681, cn=Sanjay R More
Date: 2017.11.15 18:23:27 +05'30'

**सं.रा.मोरे**

महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रत,

१.महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल यांचे सचिव,मलबार हिल,मुंबई.

२.मा.मुख्यमंत्री महोदयाचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.

३.सचिव ,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधान भवन,मुंबई.

४.मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.

५.मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.

६.मा.मंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.

७.सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य,यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.

८.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई-३२.

९.प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई.

१०.सर्व अप्पर मुख्य सचिव/,प्रधान सचिव.३२-मुंबई,मंत्रालय,सचिव/

११.महा प्रबंधक.मुंबई,उच्च न्यायालय,
१२.प्रबंधक.औरंगाबाद/नागपूर,खंडपीठ,मुंबई,उच्च न्यायालय,
१३.सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.मुंबई,मंत्रालय,
१४.संचालक.मुंबई,आरोग्य सेवा,
१५.सहसंचालक,(वैद्यकीय) आरोग्य सेवा,मुंबई.
१६.महालेखापाल ,२ / १ महाराष्ट्र,लेखा व अनुज्ञेयता.नागपूर/मुंबई,लेखा परीक्षा/
१७.कार्यासन सेवा.३२-मुंबई,मंत्रालय,वित्त विभाग,५-व्यय/५-
१८.कार्यासन.३२-मुंबई,मंत्रालय,विधी व न्याय विभाग,४-
१९.अधिदान व लेखाधिकारी.मुंबई,
२०.सर्व कार्यासन अधिकारी,सार्वजनिक आरोग्य विभाग,उप सचिव/अवर सचिव/ मंत्रालय, मुंबई
२१.निवडनस्ती.मुंबई,मंत्रालय,सार्वजनिक आरोग्य विभाग,२-राकावि,